**रे.क.नं. १३७/२०१२**

**निशाण. ५ खालील आदेश**

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे ऑ.३९ रुल १ आणि २ प्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी केलेला आहे.

२. **वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे.**

मौजे बेलेवाडी मासा ता. कागल जि. कोल्हापूर येथील समाईक घर मिळकत (वाडा) यामधील आर सी सी पध्दतीचे बांधकाम चालू असलेले दावा कलम १—अ व १—ब मध्ये नमूद केलेली चतु:सिमापूर्वक दर्शविलेली मिळकत ही दावा मिळकत म्हणून संबोधण्यात आलेली आहे. सदरच्या वाडयामध्ये वादी, प्रतिवादींचे वडील हे समजूतीने वहिवाटीमध्ये आहेत. त्यांच्यामध्ये अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. सदर वाडयामध्ये वादी प्रतिवादींची समाईकपणे वहिवाट चालू आहे. असे असताना प्रतिवादी यांनी ता. १५/१/२०१२ रोजी दावा मिळकतीमध्ये असलेली वादी यांची असलेली जाणेयेणेची वहिवाट बंद केली व जोतीबा कुलदैवताची पालखी ठेवण्याच्या धार्मिक व पवित्र स्थळी बांधकाम करण्याची भाषा केली व दावा मिळकतीमध्ये बांधकामही सुरू केलेले आहे. त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा दावा कायम मनाई व आज्ञार्थी मनाईकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाने प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी दावा मिळकतीमध्ये असलेल्या वादीच्या वहिवाटीस हरकत अडथळा करून कोणत्याही स्वरूपाचे बेकायदेशीररित्या बांधकाम करू नये याकरिता तुर्तातुर्त मनाईची मागणी केलेली आहे.

३. प्रतिवादीने नि. २१ ला कैफियत व म्हणणे देवून वादींच्या दाव्यातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादीचे म्हणण्यानुसार दावा मिळकतीमध्ये वादींची समाईक वहिवाट कधीही नव्हती. दावा मिळकत १—ब याचा बोध होत नाही. दावा मिळकती या केंव्हाही श्री. जोतीबा देवाच्या

पालख्या ठेवण्याची जागा म्हणून वापरात नाही. दावा मिळकत १—अ ग्रामपंचायत मिळकत नं. ४/८ ही संपूर्ण मिळकत प्रतिवादींच्या प्रत्यक्ष मालकी व वहिवाटीची आहे. प्रतिवादी हे त्यांच्या मालकीच्याच मिळकतीमध्ये बांधकाम करीत आहेत. त्यामुळे ते थांबविण्याचा अधिकार वादींना मुळीच नाही. या मुद्दयांवर वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याबाबत प्रतिवादीने विनंती केली आहे.

४. वादींतर्फे विद्वान वकील श्री. ए.जी. देसाई व प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. एस.एम सावर्डेकर यांचा युक्तीवाद ऐकला. वरील परस्पर विरोधी कथनांवरून खालील मुद्दे विचाराधीन निघतात. त्यावरील माझे निष्कर्ष त्याखाली दिलेल्या कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादीं हे आपल्या हितात सकृतदर्शनी केस सिध्द करतात काय? | नकारार्थी |
| २. न्यायाचा समतोल वादींच्या हक्कात आहे काय ? | नकारार्थी |
| ३. प्रस्तुत अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय ? | नकारार्थी |
| ४. काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

५. वादींनी आपली केस सिध्द करण्यासाठी नि. ३ चे कागद यादीसोबत दावा मिळकतीचे फोटो, ग्रामपंचायत मिळकत नं. ४/८, ४/१, ४/५, ४/३, व ४/४ यांचे असेसमेंट उतारे, ग्रामपंचायतीकडे दिलेला अर्ज व नि. ८/१ ला समजुतीचा नकाशा दाखल केला आहे. तसेच नि. २४ च्या कागदयादी सोबत ग्रा. मिळकत नं. ४/८ चा सन १९९६—९७ ते १९९९—२००० चा असेसमेंट उतारा, फाळा पावती दाखल केली आहे. या

व्यतिरिक्त वादीने नामदेव बाळू नांदेकर, अनंत गणपती हातकर, लक्ष्मण रामू हातकर, पांडूरंग शंकर पाटील, सखाराम कोंडीबा पाटील व कृष्णा जानू घोडके यांचे शपथपत्र अनुक्रमे नि. १५,१६,१८,२५,२६ व २७ ला दाखल केले आहे.

६. प्रतिवादींनी नि. १९ च्या कागदयादीसोबत जुन्या घराचे फोटो, दावा मिळकतीतील बांधकामाचे फोटो, ग्रा.मिळकत नं. ४/८ चा असेसमेंट उतारा तर नि. २९ च्या कागदयादीसोबत ग्रा.मिळकत नं. ४/८ चे सन २०००—२००१ चा असेसमेंट उतारा, ग्रामपंचायत कर पावत्या दाखल केलेल्या आहेत. याव्यतिरिक्त गोविंद कृष्णा पाटील, राजाराम गणू पाटील, दत्तात्रय भाउ सुतार व सदाशिव इश्वरा पाटील यांचे शपथपत्र नि. ३० ते ३४ ला दाखल केलेले आहे व नि. ३५ ला हमीपत्र दिलेले आहे.

**मुद्दा क. १ ते ३ बाबत :**

७. वादींनी तुर्तातुर्त मनाई आदेश मिळविणेकरिता खालील ३ गोष्टी वादीच्या हितात असल्याचे सिध्द केले पाहीजे.

१. सकृतदर्शनी केस ( Prima-facie case)

२. न्यायाचे समतोलत्व ( Balance of convenience)

३. वादीची हानी व अपरिमित नुकसान (Irreparable loss)

८. वादींच्या कथनांनुसार दावा मिळकत १—अ व १—ब ही समाईक घ रमिळक्त (वाडा ) आहे व वादीची समाईकात वहिवाट चालू आहे. त्यामुळे प्रथमतः वादींची समाईकामध्ये वहिवाट चालू आहे का हे पहाणे गरजेचे आहे. दावा मिळकत १—अ म्हणजेच ग्रा. मिळकत नं. ४/८ याचे ग्रा. मिळकतीचे नि. ३/९ व ३/१० चे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरच्या मिळकतीवर प्रतिवादींची नावे मालकी व वहिवाटीसदरी नोंद आहे. त्यावर वादींची अगर त्यांच्या पूर्वहक्कदारांची नावे नाहीत. तसेच त्यावर समाईक अशी देखील

नोंद नाही. वादींची दावा मिळकतीमध्ये समाईक वहिवाट कशी सुरू झाली व कोणत्या संबंधाने सुरू झाली याबाबत काहीही नमुद केलेले नाही. सदर ग्रा. मिळकत नं. ४/८ यावर प्रतिवादींच्या नावाची नोंद ही सन १९९६ —१९९७ पासून आहे. त्याबाबत आजअखेर कधीही हरकत नोदविली नाही. दावा मिळकत ही समाईक आहे हे दाखविणयाकरीता वादींनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

९. वादींनी दावा कलम १ मध्ये नमूद केलेली दावा मिळकत १—ब याा ग्रमपंचायत मिळकत नंबर नमूद केलेला नाही. तसेच संबंधीत महसूली अधिकारी अगर ग्रामपंचायतीकडून दावा मिळकतीचा नकाशासुध्दा दाखल केलेला नाही. त्यामुळे दावा मिळकत १—ब याचा बोध होत नाही. तसेच दावा मिळकत १—ब ही समाईक मालकी वहिवाटीची व रूढी परंपरेने श्री जोतीबा देवस्थानाची दुसरी पालखी ठेवण्याची जागा असल्याचे वादींनी प्रथमदर्शनी सिध्द केलेले नाही. वादींनी सदरची जागा ही जोतीबाची पालखी ठेवण्याची जागा असल्याचे सिध्द करण्याकरिता नामदेव नांदेकर, अनंत हतकर,लक्ष्मण हातकर, पांडूरंग पाटील कृष्णा घोडके व सखाराम पाटील यांचे शपथपत्र दाखल केले आहे. परंतु दावा मिळकतीच्या असेसमेंट उता—याचे अवलोकन केल्यास सदरची दावा मिळकत ही समाईकात असल्याचे दिसत नाही.

१०. प्रतिवादींनी नि. ३५ ला प्रतिवादी करत असलेले बांधकाम हे ग्रामपंचायत मिळकत नं. ४/८ या मिळकतीमधील स्वतःचे जुने घर उतरवून नवीन घराचे बांधकाम करत असल्याचे कथन केले आहे. तसेच प्रतिवादीने कोणतेही अतिक्रमण करून बांधकाम करीत नाहीत. अतिक्रमण करून बांधकाम केले आहे असे वादींनी दाव्याच्या कामी सिध्द केलयास प्रतिवादी ते स्वत: उतरवून घेत असल्याबाबत प्रतिवादींनी हमीपत्र (अंडरटेकींग) दिलेले आहे. प्रतिवादी हे त्यांच्याच मिळकतीमध्ये बांधकाम करीत आहेत हे दाखविण्याकरीता

गोविंदा पाटील, राजाराम पाटील, दत्तात्रय पाटील, व सदाशीव पाटील यांची शपथपत्रे नि. ३० ते ३४ ला दाखल केलेली आहेत. यदाकदाचित प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याचे सिध्द झाल्यास प्रतिवादी ते स्वत: काढून घेणार आहेत. त्यामुळे प्रतिवादीविरूध्द तुर्तातुर्त मनाई करणे न्यायोचित होणार नाही.

११. वादीतर्फे विद्वान वकील श्री. ए.जी. देसाई यांनी असा युक्तीवाद केला की प्रतिवादींनी बांधकामाकरिता कोणतीही परवानगी ग्रामपंचायतीकडून घेतलेली नाही. त्यामुळे मुळातच बांधकाम बेकायदेशीर ठरते. वादाकरिता तसे मान्यही केल्यास ग्रामपंचायत प्रतिवादींचे विरूध्द कारवाई करू शकते. तसेच वादीतर्फे असेही सांगणेत आले की सहहिश्येदारास अन्य हिश्येदारांच्या संमंत्तीशिवाय बांधकाम करता येणार नाही. त्यासाठी त्यांनी मा. गुजराथ उच्च न्यायालयाचा **इब्राहिम महमद वि. नुरमहमद (ए.आय.आर १९८४ गुजराथ १२६)** चा दाखला दिला. मी सदरच्या न्यायनिवाडयाचे काळजीपूर्वक वाचन केलेले आहे. त्यामध्ये नमूद केलेल्या न्यायतत्वांचा मान राखून सदरचे न्यायतत्व हे वादींना कोणत्याही प्रकारे मदत करणारे नाही. कारण प्रस्तुत कामामध्ये प्रथमदर्शनी वादींनी त्यांची समाईक वहिवाट असल्याचे सिध्द केलेले नाही.सदर कोल्हापूरी वाडा यामध्ये ग्रामपंचायत मिळकत नं. ४ चे पोटहिस्से करून १ ते ८ नंबर दिलेले दिसतात व त्यानुसार प्रत्येकाची वहिवाटीप्रमाणे नोंद दिसते. त्यानुसार ग्रामपंचायत मिळकत नं. ४/८ ला प्रतिवादींची नोंद आहे. एकूणच वरील विवेचनानुसार वादींनी दावा मिळकत ही समाईक वहिवाटीची असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केलेले नाही. न्यायाचा तराजु हा वादींच्या बाजुने झोकत नाही. याउलट प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये खर्च करून बांधकाम केलेले आहे ते थांबल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. त्यामुळे मी मुददा क्र. १ ते ३ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुददा क्रमांक ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादींचा निशाणी ५ चा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२. आजपर्यंत असलेले स्थगीतीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

कागल

दिनांक : १०/०२/२०१२

सही/—

(प.रा. वागडोळे)
सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर,
कागल.